# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ४/२२ दिनांक :- ०३/०१/२०२२

## नोकरी लावुन देण्याच्या बहाण्याने लोकांची आर्थीक फसवणुक करणा-या आरोपीतास दिल्ली येथुन अटक- गुन्हे शाखा कक्ष -3 यांची कामगिरी.

फिर्यादी श्री. रितेशकुमार दयाशंकर दुबे यांना नोकरीस लावून देतो असे सांगुन आरोपी सुनिलकुमार शिवाजी गुप्ता याने फिर्यादीकडून १,००,०००/- रुपये (एक लाख) घेऊन त्यांना नोकरीस न लावता व त्यांचे पैसे परत न करता फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली म्हणुन विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर व कलम ९११/२०२१ भा.द.वी.सं. कलम ४२० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आला होता.

सदर गुन्हयाची गांभिर्याने दखल घेवुन गुन्हयातील आरोपीत यांचा शोध घेणे बाबत मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदार यांनी सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला. तपासादरम्यान आरोपीत याचा तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या बातमीच्या आधारे आरोपीत नामे - सुनिल कुमार शिवाजी गुप्ता वय ३१ वर्षे, रा जि. बक्सर, राज्य बिहार यास दिल्ली येथुन दिनांक ०२/०१/२०२१ रोजी ताब्यात घेवुन पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले असून सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने त्यास अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पोना/ सागर बारवकर सर्व नेम- गुन्हे शाखा यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.